जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १०४१ दिनांक ०१/०७/२०२०**

## युनिट-३ गुन्हे शाखा पुणे शहर

## शिकलगरी टोळीतील गुन्हेगाराना युनिट-३ कडून अटक/ घरफोडी चोरीचे गुन्हे उघड

मा.पोलीस आयुक्त,डॉ.के.व्यंकटेशन, पुणे शहर व पोलीस सहआयुक्त,रविंद्र शिसवे यांनी पुणे शहरातील गुन्हेगारी समुळ नष्ट व्हावी, गुन्हेगारांवर वचक बसावा तसेच घरफोडी चोरीचे गुन्हे घडू नयेत व दाखल गुन्हे उघडकीस आणावेत म्हणुन अभिलेखावरील घरफोडीचे आरोपींचा शोध घेऊन त्यांचे विरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत वेळोवेळी आदेश दिलेले आहे. त्यानुसार कारवाई चालु आहे.

दि.२३/०६/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी युनिट.३ गुन्हे शाखा पुणे शहर यांना गुप्त बातमी मिळाली की, शिकलगरी टोळीतील घरफोडी चोरी करणारा व घरफोडी चोरीचे गुन्हयात पाहिजे असलेला पोलीस रेकॉर्ड वरिल अट्टल गुन्हेगार रविसिंग कल्याणी रा. रामटेकडी हडपसर पुणे व त्याचा साथीदार युवराज मोहिते रा. सांगली हे दोघे फुगेवस्ती भोसरी येथे येणार आहेत. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी यांनी त्यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या टिम तयार करुन फुगेवस्ती भोसरी पुणे येथे सापळा लावून थांबले असता त्या ठिकाणी रेकॉर्ड वरिल गुन्हेगार रविसिंग कल्याणी व त्याचा साथीदार युवराज मोहिते हे आल्याची खात्री होताच त्यांना शिताफिने पकडण्यात आले आहे. रविसिंग शामसिंग कल्याणी रा. कोठारी व्हिल्स शोरुम मागे रामटेकडी हडपसर पुणे याने व युवराज वसंत मोहिते रा.मु. पो तोंडोळी, ता.कडेगाव, जि.सांगली यांनी त्यांचे साथीदार तिलकसिंग गब्बरसिंग टाक व आजीनाथ लक्ष्मण गायकवाड यांनी दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील साईबाबा वसाहत येथे घरफोडी चोरी केली असल्याने त्याबाबत दत्तवाडी पो.स्टे येथे गु.र.नं.१४३९/२०२० भादवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात आरोपींना अटक करण्यात आली आहे.सदर आरोपी हे दि.०२/०७/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडीमध्ये असून तपासामध्ये आरोपींनी वारजे माळवाडी पो.स्टे, दत्तवाडी, अलंकार व स्वारगेट पो.स्टे चे हद्दीत घरफोडी चोरीचे व खडक पो.स्टे चे हद्दीत वाहन चोरी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांचेकडून एक मारुती सुझूकी इको कार, गुन्हा करणेसाठी वापरलेली बजाज पल्सर २२० मोटार सायकल व सोन्या,चांदीचे दागिने तसेच घरफोडीची साधने असा सर्व मिळून १०,२५,०००/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण अडागळे हे करीत आहेत. आरोपी रविसिंग कल्याणी हा पाच घरफोडीच्या व हडपसर येथील दरोडयाची

तयारीचे गुन्हयातील फरारी आरोपी आहे. त्याचे विरुध्द यापुर्वी एकुण ३१ घरफोडी व वाहन चोरीचे गुन्हे तसेच तिलकसिंग याचे विरुध्द यापुर्वी एकूण ३५ घरफोडी, वाहनचोरी,दरोडा व शस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत.

यातील आरोपी युवराज मोहीते याने कराड शहर पोलीस ठाण्याचे हद्दीतील हद्दीतील मु.पो.बनवडी ता. कराड जिल्हा सातारा येथे राहणारा त्यांचा मित्र नामे अभिजित तुळशीदास पवार याचे मानेवर सत्तूरने वार करुन त्याचा खुन केला असल्याचे उघडकीस आले आहे. प्रस्तूत प्रकरणी कराड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९९/२०१७ भा.दं.वि.कलम ३०२,४५२ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हा त्याने व त्याचा साथीदार अमोल पोळ असे दोघांनी केला असल्याचे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.अशोक मोराळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री.बच्चन सिंग,मा.सहा पोलीस आयुक्त,प्रतिबंधक डॉ.शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंन्द्र मोकाशी, सहा पोलीस निरीक्षक भालचंद्र ढवळे, पोलीस उप निरीक्षक किरण अडागळे, स्टाफ किशोर शिंदे, दत्तात्रय गरुड, दिपक मते,अनिल शिंदे,राहूल घाडगे, संतोष क्षीरसागर, प्रविण तापकिर, रोहिदास लवांडे,मेहबुब मोकाशी,गजानन गाणबोटे,रामदास गोणते, अतुल साठे, संदीप राठोड, संदीप तळेकर,विल्सन डिसोझा,नितीन रावळ,सचिन गायकवाड, कैलास साळुंके,कल्पेश बनसोडे, सुजित पवार, यांच्या पथकाने केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट- ३ पुणे शहर